# बांधकाम विभाग रत्नागिरी,
# जिल्हा परिषद रत्नागिरी
# मजूर सहकारी संस्था
# जिल्हा परिषद रत्नागिरी

**ई-निविदेच्या माध्यमातून देण्याची कामे क्रमांक ०३ सन २०२६-२७**
**(रत्नागिरी जिल्हयातील मजूर सहकारी संस्था यांचे करीता राखीव)**

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग रत्नागिरी, जिल्हा परिषद रत्नागिरी हे मजूर सहकारी संस्थांना, काम वाटप समितीद्वारे स्पर्धात्मक दराने खालील कामे ई-निविदा (e-Tender) च्या माध्यमातून मागवित आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा रक्कम | मजूर सहकारी संस्था वर्ग | निविदा अर्जाची विक्री किंमत | मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | | ४ | ५ |
| १ | मौजे धामापूर तर्फे संगमेश्वर बोलेवाडी येथे सार्वजनिक सभागृह बांधणे ता. संगमेश्वर | १७०००००/- | १४१३५४९/- | अ कुशल | १०००/- | १८० दिवस |

## TENDER SCHEDULE

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Period of downloading bidding documents | From<br>To | 14/05/2026<br>ते<br>28/05/2026 | TIME<br>TIME | 11.00<br>17.00 | Hrs<br>Hrs |
| Submission of bids | From<br>To | 14/05/2026<br>ते<br>28/05/2026 | TIME<br>TIME | 11.30<br>17.00 | Hrs<br>Hrs |
| Time and date of opening technical bid | From | 01/06/2026 | TIME | 17.00 | Hrs |
| Time and date of opening financial bid | From | 01/06/2026 | TIME | 18.00 | Hrs |
| Authorised officers under Z.P.Ratnagiri to open the bid | Add. Chief Executive Officer<br>Executive Engineer, Works Division Ratnagiri<br>CAFO | | | | |

सदर निविदेमधील कामे महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल. यासंबंधीच्या आवश्यक माहिती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. संकेतस्थळावर कामासंबंधी दिलेली माहिती काळजीपूर्वक वाचून ई-निविदा भरावी.

**<u>अटी व शर्ती</u>**

जिल्हा परिषद रत्नागिरी यांचे अधिनस्त नोंदणी झालेल्या मजूर सहकारी संस्थाच यामध्ये भाग घेऊ शकतात.

१. मजूर सहकारी संस्थांनी निकोप स्पर्धा करावयाची असून स्पर्धात्मक दराचा फायदा देणाऱ्या मजूर सहकारी संस्थेस काम देण्यात येईल. **निविदाकाराने मक्तेदार नोंदणी प्रमाणपत्र, वस्तू व सेवा कर नोंदणी दाखला, पॅन कार्ड तसेच किमान २०२५-२६ (Assesement Year) चा आयकर भरणा केल्याबाबतचा पुरावा यांच्या स्कॅन प्रती व पूर्ण केलेल्या कामांचे दाखले अनुक्रमे जोडणेत यावेत तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मजूर संघाकडील पात्रता दाखला** जोडण्यात यावा.

२. निविदाकाराने कार्यालयाकडून अपलोड केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले आहे व त्या मधील सर्व अटीशर्ती निविदाकारास मान्य आहेत असे समजून त्याने निविदा सादर केलेली आहे असे समजणेत येईल.

३. निविदा सादरीकरण/ स्विकृती फक्त ऑनलाईन पद्धतीनेच करणेत येतील. भरलेल्या निविदे संबंधातील कोणतेही मूळ कागदपत्रे किंवा छायांकित सत्यप्रती जमा करण्यासाठी कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. तथापि न्युनतम देकार निविदाकाराला Financial Bid Opening नंतर निविदा स्विकृतीपूर्वी सर्व Upload केलेली कागदपत्रे मूळ कागदपत्रांबरोबर **सहाय्यक लेखाधिकारी बांधकाम विभाग रत्नागिरी** यांचे कडून पडताळणी करून घेणे बंधनकारक राहिल. कोणतेही कारण न दर्शविता ऑनलाईन निविदा स्विकारणेचा व नाकारणेचा अधिकार **कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद रत्नागिरी** राखून ठेवत आहे.

४. कोणत्याही कामाची मागणी मजूर सहकारी संस्थेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची नोंदवली गेली असल्यास वाटाघाटी करण्यात येतील. निविदेच्या वाटाघाटीस कोणत्याही मजूर संस्थेने प्रतिसाद न दिल्यास ते काम मजूर सहकारी संस्थेच्या राखीव कोठयातून वगळून त्या कामाची शासनाने विहित केलेल्या अन्य पध्दतीने निविदा निश्चिती करण्यात येईल.

५. ई-निविदेच्या माध्यमातून एका कामासाठी एकापेक्षा जास्त मजूर सहकारी संस्थांकडून निविदा भरलेली असेल व ज्या मजूर संस्थांचा स्पर्धात्मक दर समान असेल अशा बाबतीत सर्वात कमी दर असलेल्या समान दर दिलेल्या मजूर सहकारी संस्था वाटाघाटी करण्यासाठी पात्र राहतील.

६. ज्या नोंदणीकृत मजूर सहकारी संस्थेने 5 लाखपर्यंतचे पहिले काम यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. अशाच मजूर संस्थांनी यांनी यामध्ये भाग घ्यावा.

७. आपल्या मजूर संस्थेस चालू आर्थिक वर्षात किती रक्कमेची कामे देण्यात आलेली आहेत याची माहिती काम वाटप समितीकडून घेण्यात यावी. काम वाटप समितीकडून घेण्यात येणारी कामे घेतेवेळी रुपये 100.00 लक्ष च्या मर्यादेपेक्षा जास्त होणार नाहीत याची दक्षता घेणेत यावी. तसेच जादा रक्कमेची कामे देण्यात येत असतील तर हि बाब त्वरीत काम वाटप समितीच्या निदर्शनास आणून द्यावी.

८. ई-निविदा माध्यमातून मिळालेल्या कामांबाबतच्या सर्व अटी शर्तीची पूर्तता केली असल्याची खात्री करुनच काम मजूर संस्थेच्या नांवे मंजूर करण्यात येईल. तसेच ई-निविदेनुसार मजूर सहकारी संस्थेस मिळालेले काम मजूर संस्थेस मंजूर करण्याबाबत योग्य ते निर्णय घेण्याचे अधिकार काम वाटप समितीस राहतील.

९. एकदा भरलेली निविदा कोणत्याही कारणास्तव मागे घेता येणार नाही याची नोंद घेणेत यावी.

१०. डांबरीकरणाच्या कामांबाबत ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्र.पंरास-२०१५/प्र.क्र.३४६/पंरा- दि.१३/०४/२०१७ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार काम सूरु करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.

११. ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.३०.०६.२०२१ नुसार मजूर सहकारी संस्थांची वर्गवारी बदलण्यात आलेली असून सुधारित वर्गवारीनुसार नोंदणी प्रमाणपत्र निविदेसोबत अपलोड करणे आवश्यक आहे अन्यथा तांत्रिकदृष्टया अपात्र ठरविण्यात येईल.

.

१२. मूल्यांकनाप्रमाणे वस्तु व सेवाकराची रक्कम मक्तेदाराला स्वतंत्ररित्या अदा करण्यात येईल. निविदा रकमेमधील अंतर्भुत गौणखनिजाची रक्कम मूल्यांकनानुसार अदा केली जाईल .मक्तेदाराने कमी /अधिक दराने भरलेले निविदा गौणखनिज दर व गुणनियंत्रण चाचणी शुल्कासाठी लागू रहाणार नाही.

क्र.रजिप/बांधकाम/लेशा/मजूर-०३/२९५५/२०२६-२७
बांधकाम विभाग रत्नागिरी, जि.प.रत्नागिरी
दिनांक :- १४/०५/२०२६

**कार्यकारी अभियंता**
**बांधकाम विभाग रत्नागिरी**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

प्रत :- कार्यालयीन सुचना फलकावर माहितीसाठी
प्रत :- महाराष्ट्र शासनाच्या http//:mahatenders.gov.in यासंकेतस्थळावर Upload करणेसाठी
स्थळावर Upload करणेसाठी

Signature Not Verified
Digitally signed by Bharati Suresh Biraje
Date: 2026.05.14 10:19:32 IST
Location: Maharashtra-MH